# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २४ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## विद्यार्थ्यांचे बळी घेणारी 'कोचिंग' संस्कृती आणि प्रशासकीय अंधार

उत्तर प्रदेशातील लखनौच्या अलिगंजमधील पुरानिया परिसरात एका तीन मजली इमारतीला लागलेली भीषण आग आणि त्यात चौदा निष्पाप विद्यार्थ्यांचा झालेला दुर्दैवी मृत्यू ही केवळ एक दुर्घटना नाही, तर तो थेट प्रशासकीय निष्काळजीपणाचा आणि मानवी क्रूरतेचा कळस आहे. स्पर्धा परीक्षांचे आणि उज्ज्वल भविष्याचे स्वप्न डोळ्यात घेऊन घराबाहेर पडलेल्या या कोवळ्या मुलांना...

---> अग्रलेख - पान 2 वर


**पाहिजेत**

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


# पोलीस दलात मोठे फेरबदल; गृह विभागाकडून आयपीएस आणि राज्य पोलीस सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने राज्य पोलीस दलात अत्यंत व्यापक आणि महत्त्वपूर्ण फेरबदल केले आहेत. पोलीस आस्थापना मंडळाच्या शिफारशींचा विचार करून आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदींनुसार भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) आणि राज्य पोलीस सेवेतील एकूण १२ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. यामध्ये 'अपर पोलीस महासंचालक' (ADG) श्रेणीतील दोन अतिवरष्ठ अधिकाऱ्यांसह इतर १० वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. गृह विभागाचे सहसचिव सुग्रिव धपाटे यांच्या स्वाक्षरीने हे आदेश निर्गमित करण्यात आले असून, यामुळे अनेक जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक आणि महत्त्वाच्या शहरांचे पोलीस उपायुक्त बदलले आहेत.

या अंतर्गत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (ACB) अपर पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांची नागपूर शहराच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर नागपूरचे विद्यमान पोलीस आयुक्त श्री. रवींद्र सिंघल यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अपर पोलीस महासंचालक पदावर बदली करण्यात आली आहे. या दोन दिग्गज अधिकाऱ्यांनी आपापल्या पदांची अदलाबदली केली असून, कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी प्रशासकीय निकडीतून हा मोठा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे.

इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांची नवी मुंबई येथे पोलीस उपायुक्त (डायल १११) पदावर बदली करण्यात आली आहे. हिंगोलीचे पोलीस अधीक्षक निलभ रोहन यांच्याकडे आता नांदेडच्या पोलीस अधीक्षकपदाची नवीन जबाबदारी सोपवण्यात आली असून, नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांची पुणे शहराच्या पोलीस उपायुक्तपदी बदली झाली आहे. खामगाव (बुलढाणा) येथे कार्यरत असलेले अपर पोलीस अधीक्षक या पदावरून श्रेणिक लोढा यांची पदोन्नतीने हिंगोलीचे नवीन पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवी मुंबईच्या पोलीस उपायुक्त रूपाली अंबुरे यांची महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या पोलीस अधीक्षक पदावर बदली करण्यात आली आहे.

तसेच, नागपूरचे पोलीस उपायुक्त शशिकांत सातव यांची छत्रपती संभाजीनगरचे नवीन पोलीस उपायुक्त म्हणून, तर अमरावतीचे पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांची नागपूर शहराच्या पोलीस उपायुक्तपदी बदली झाली आहे. चंद्रपूर येथील राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १७ चे समादेशक पीयुष जगताप यांची खामगाव (बुलढाणा) येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गडचिरोलीचे राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १३ चे समादेशक नारायण शिरगावकर यांची कुसळगाव (अहिल्यानगर) येथील राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १९ च्या समादेशक पदावर बदली करण्यात आली आहे. अमरावती येथील गुन्हे अन्वेषण विभागाच्या (गुअवि) पोलीस अधीक्षक प्रांजली सोनावणे यांची आता अमरावती शहराच्या पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व अधिकाऱ्यांना आपापल्या नवीन पदांचा कार्यभार तात्काळ स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## थोडक्यात वार्ता

### निदा खानच्या वैद्यकीय तपासणीचे न्यायालयाचे आदेश




**नाशिक :** नाशिकच्या TCS कंपनीत कार्यरत असलेल्या तरुणीवरील कथित बलात्कार, धर्मांतराचा प्रयत्न आणि ॲट्रॉसिटी कायद्यान्वये दाखल गुन्ह्याच्या तपासात आणखी एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील प्रमुख संशयितांपैकी एक असलेल्या निदा खान हिची वैद्यकीय तपासणी करण्याचे आदेश नाशिकरोड अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिले आहेत. देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या या प्रकरणाची सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पार पडली. न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी २२ जुलै ही तारीख निश्चित केली असून, संशयितांनी दाखल केलेल्या जामीन अर्जावरील सुनावणी गुरुवारी (दि. २५) होणार आहे.


### राज्यातील 30 जिल्ह्यांना अलर्ट

मुंबई : मुंबईसह राज्यातील काही भागात मंगळवारी (२३ जून) ला पावसानी हजेरी लावली. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार संपूर्ण मराठवाडा मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. येत्या २४ तासांत आणखी काही भागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवामान विभागे दिलेल्या माहितीनुसार, राज्यात २४ जूनसाठी ३० जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोणकणातील काही भागात पावसाची तिव्रता वाढण्याची शक्यता आहे. पालघरसह काही जिल्ह्यांना विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ठाणे, मुंबई, रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळे सर्व जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आले आहे. तर रत्नागिरीत मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### प्रियसीनेच केली प्रियकराची हत्या

**पुणे :** पुण्यामध्ये एक धक्कादायक आणि विचीत्र असा प्रकार उघडकीस आला आहे . आजकालच्या जीवनात कोणावर विश्वास ठेवायचा आणि कोणावर नाही हा मोठा प्रश्न पडतो. आपण ज्याव्यक्तीवर प्रेम करतो ज्याव्यक्तीची काजळी घेतो पण समोरच्या व्यक्ती साठी तो फक्त टाईमपास असतो. हे जेव्हा असं चित्र आपल्या डोळ्यासमोर तेव्हा आपल्या डोळ्यात अक्षरशा पाणी येत. केतन अग्रवाल आणि सिया गोयलवर हे दोघे एकमेकांवर प्रेम करत असतात. दोघे काही दिवसांनी लग्नसंबंधात अडणार होते. मात्र अशी काहीं घटना घडू शकते असं कोणी विचार पण नसेल केला. केतन अग्रवाल आणि सिया गोयलवर हे दोघे पुण्यातील लोहगड येथे फिरायला गेला होते. त्या दिवशीं रिया चा वाढदिवस असतो. केतनने तिला खुश करण्यासाठी सरप्राईस प्लॅन करतो. तो तिला डोळे बंद करायला सांगतो. त्यानंतर तो तिला एक फुल देतो. डोळे उघडल्यावर सिया खुश होते. आनंदाने हसते. मग तो गाडीचं सनरुफ उघतो. तिथे तिच्या आवडीची फुलं ठेवलेली असतात. ते पाहून तर सियाचा आनंद गगनात मावेनासा होतो. ती आनंदाच्या भरात केतनला मिठी मारते. त्यानंतर हे दोघे एका रेस्टॉरंटमध्ये जातात. तिथे सियासाठी खास म्युझिक वाजवले जाते. समोर केक ठेवलेला असतो. सियाला तो ढोपरावर बसून तिला गुलाबाचं फुल देतो. त्यानंतर ते तिथं डान्स ही करतात.

## "खरं की काय"




# शहरातील 49 कॅफेंवर धडक कारवाई





हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील कॅफे संस्कृतीवर प्रशासनाने मोठा अंकुश आणण्याच्या दिशेने पाऊल टाकत कॅनॉट परिसरासह विविध भागांतील तब्बल ४९ कॅफेंवर महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त धडक कारवाई केली. नियमांचे उल्लंघन, अनधिकृत बांधकामे, बंदिस्त पार्टिशन उभारणे तसेच काही ठिकाणी संशयास्पद प्रकार सुरू असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत ही कारवाई करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून शहरातील काही कॅफेंमध्ये स्वतंत्र केबिन आणि बंदिस्त पार्टिशन तयार करून नियमांना हरताळ फासला जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे येत होत्या. काही ठिकाणी या सुविधांचा गैरवापर होत असल्याचेही निदर्शनास आल्याने महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला.

सकाळपासून कॅनॉट परिसरासह शहरातील विविध भागांमध्ये कारवाईला सुरुवात करण्यात आली. पथकांनी कॅफेंची तपासणी करत नियमभंग आढळलेल्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे आणि पार्टिशन हटविण्याची कारवाई केली. या मोहिमेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे कॅफे व्यावसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली. अनेक ठिकाणी कारवाई सुरू असताना नागरिकांनीही प्रशासनाच्या भूमिकेचे स्वागत केल्याचे दिसून आले.

## गंगापुरात बेकायदेशीर पाण्याचा प्लांट सील; 10 लाखांचा साठा 'एफडीए'कडून जप्त

**छत्रपती संभाजीनगर :** अन्न व औषध प्रशासनाने (FDA) जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील गंगापूर येथे अवैध पॅकेज्ड पिण्याच्या पाण्याच्या प्लांटवर एक मोठी कारवाई केली आहे. आवश्यक परवानग्या नसताना आणि ग्राहकांची उघड दिशाभूल करत सुरू असलेल्या या प्लांटवर धाड टाकून तब्बल १० लाख १ हजार ६०० रुपयांचा पाण्याचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या धडक कारवाईमुळे अवैध पाणी व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत. याबाबत सविस्तर वृत्त असे की, गंगापूर येथील एका पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर प्लांटमध्ये नियमांचे उल्लंघन करून पाशवी नफेखोरीसाठी पाणी विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे 'एफडीए'च्या पथकाने तातडीने या प्लांटवर छापा टाकला. या तपासणीत संबंधित प्लांटकडे व्यवसाय चालवण्यासाठी आवश्यक असणारे वैध परवाने आढळून आले नाहीत. तसेच बाटल्यांवर भ्रामक व चुकीची माहिती छापून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याचेही समोर आले. या कारवाईदरम्यान पथकाने घटनास्थळावरून 'ओमरिच', 'यशरिच' आणि 'हायड्राशुअर' या ब्रँड्सच्या पाण्याचे नमुने जप्त केले असून ते पुढील प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

नियमांची पायमल्ली करणाऱ्या या संबंधित आस्थापनाला प्रशासनाने तातडीने 'स्टॉप बिझनेस' (व्यवसाय बंद करण्याची) नोटीस बजावली आहे. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या कडक आणि शिस्तबद्ध मार्गदर्शनाखाली ही कारवाई पूर्ण करण्यात आली असून, आरोग्याशी खेळणाऱ्या अशा कोणत्याही अवैध पाणी प्लांटवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## नोकरी लावून देतो म्हणत लावला 21 लाखांचा 'चुना'

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय सेवेत पुरवठा निरीक्षक म्हणून नोकरीला लावून देतो, असे आमिष दाखवून एका ३१ वर्षीय युवकाला भामट्याने २१ लाख रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक घटना सिडकोतील कॅनॉट प्लेस येथे उघडकीस आली आहे. पीडित युवकाच्या तक्रारीवरून सिडको पोलिसांनी पुण्याच्या एका संशयित भामट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. याबाबत सविस्तर वृत्त असे की, अभिषेक अजय सावरीकर (रा. सिग्नेचर टॉवर, मॉडर्न कॉलनी, पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव असून, संदीप शेषराव काळुसे (वय ३१, रा. किनगाव राजा, ता. सिंदखेड राजा, जि. बुलडाणा) असे फसवणूक झालेल्या युवकाचे नाव आहे. संदीप हे कंत्राटी पद्धतीने महाराष्ट्र विद्युत विभागात ऑपरेटर म्हणून कार्यरत आहेत. त्यांची ओळख आरोपी अभिषेकसोबत सन २०२३ मध्ये एका कार्यक्रमात झाली होती. त्यावेळी अभिषेकने "मी सरळसेवा भरतीत अनेक कामे करून दिलेली आहेत, तुझेसुद्धा काम करून देईन, तू २०२३-२४ या वर्षी अन्न व नागरी पुरवठा विभागांतर्गत होणाऱ्या परीक्षेचा फॉर्म भर", असे सांगून संदीप यांचा विश्वास संपादन केला. त्याच्या सांगण्यावरून संदीप यांनी फॉर्म भरला आणि परीक्षेचे प्रवेशपत्र आल्यानंतर अभिषेकने त्यांना

-> पान 2 वर

## बातमीचा दणका! वादग्रस्त पाटी गायब; तरी बाजार समितीत घाणीचे साम्राज्य कायम

### हिंदू प्रकाशवार्ताच्या वृत्तानंतर प्रशासनाची धावपळ; काही भागात स्वच्छता, अनेक ठिकाणी अजूनही कचऱ्याचे ढिगारे







बाजार समिती की कचराकुंडी?; लाखोंची उलाढाल करणारी बाजारपेठ घाणीच्या विळख्यात

सडलेल्या आंब्यांचे ढिगारे, नारळाच्या करवंट्या आणि प्लास्टिक कचऱ्याने परिसर अस्वच्छ; पावसाळ्यात दुर्गंधी व रोगराईचा धोका

हिंदू प्रकाशवार्ता | सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** कोट्यवधी रुपयांची उलाढाल आणि मराठवाड्याच्या कृषी अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समितीतील घाणीच्या साम्राज्यावर हिंदू प्रकाशवार्ताने प्रकाशझोत टाकताच प्रशासनाला अखेर धावपळ करावी लागली. वृत्त प्रसिद्ध होताच सडलेल्या आंब्यांचे ढिगारे हटविण्यात आले, कुजलेल्या फळांचा कचरा साफ करण्यात आला आणि "श्री हरिभाऊ बागडे (नाना) शेतकरी बाजार संकुल" नामफलकावर लावण्यात आलेली वादग्रस्त बुकिंगची पाटीही काढून टाकण्यात आली. मात्र या कारवाईनंतरही बाजार समितीतील अनेक भाग आजही अस्वच्छतेच्या विळख्यात असल्याचे वास्तव समोर आले आहे.

काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या वृत्तामध्ये बाजार समिती परिसरात सडलेली फळे, भाजीपाल्याचा कचरा, नारळाच्या करवंट्या, प्लास्टिक पिशव्या आणि टाकाऊ साहित्याचे ढिगारे यामुळे निर्माण

-> पान 2 वर

## शासन मान्य अनुदानित आश्रम शाळा संघटना महाराष्ट्र राज्य नाशिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे बैठक संपन्न

**छत्रपती संभाजीनगर :** आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य नाशिक च्या छत्रपती संभाजी नगर प्रकल्प कार्यकारणी ची बैठक मा. प्रकल्प अधिकारी मॅडम यांच्यासोबत यशस्वीपणे संपन्न झाली, या बैठकीला राज्य कार्याध्यक्ष मा. साहेबराव मोहोड सर, राज्य उपाध्यक्ष व विभागीय अध्यक्ष अमरावती मा. शंकर माने सर, राज्य उपाध्यक्ष व नागपूर विभागीय अध्यक्ष मा. रवींद्र



नगराळे सर, राज्य प्रसिद्धी विभाग प्रमुख संजय देशमुख सर, छत्रपती संभाजी नगर प्रकल्प अध्यक्ष सुधाकर जाधव सर, राज्य सदस्य सुनिल लोखंडे सर, राज्य सदस्य जितेंद्र सोळुंके सर, राज्य सदस्य दीपक तुरोरीकर सर, विभागीय सदस्य विलास पाटील सर, विभागीय सदस्य अशोक गायकवाड सर, मोकडे सर, किनाके सर व भोसले सर, बन्सी काळे सर, राजेंद्र काकडे सर, बिराजदार सर, प्रमोद जाने सर कामाठी हे उपस्थित होते. बैठक अत्यन्त खेळीमेळीच्या वातावरणात झाली, बैठकीच्या सुरवातीला संघटनेचे राज्य प्रसिद्धी विभाग प्रमुख संजय देशमुख सर यांनी सूत्रसंचालन

-> पान 2 वर

## गुलमंडीत रॉंग साईडवाल्यांना दणका; दोन दिवसांत 1028 वाहनांवर कारवाई

### नियमभंग करणाऱ्यांकडून 7 लाखांहून अधिक दंड वसूल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या गुलमंडी बाजारपेठेत वाहतूक नियमांना हरताळ फासणाऱ्या वाहनचालकांविरोधात वाहतूक विभागाने मोठी कारवाई करत दोन दिवसांत तब्बल १०२८ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. प्रवेशबंद भाग आणि एकेरी मार्गांवर रॉंग साईडने वाहने चालविणाऱ्यांविरोधात राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत ७ लाख रुपयांहून अधिक

-> पान 2 वर

# अखेर दुर्घटना घडलीच : 'हिंदू प्रकाशवार्ता'च्या इशाऱ्यानंतरही महावितरण झोपेत

## पिंपळाचे झाड विद्युत तारांवर कोसळून डीपीला लागली आग

हिंदू प्रकाशवार्ता | सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** एन-२ येथील विठ्ठलनगर परिसरात सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे पिंपळाच्या झाडाची मोठी फांदी विद्युत तारांवर कोसळल्याने शॉर्टसर्किट होऊन विद्युत डीपीला आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र याच ठिकाणच्या धोकादायक परिस्थितीबाबत यापूर्वीच इशारा देण्यात आला असतानाही उपाययोजना न झाल्याने महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



घटनास्थळाजवळ महादेव मंदिर असून येथे दिवसभर भाविकांची मोठी वर्दळ असते. परिसरातील मुलेही याच भागात खेळत असतात. तसेच हा रस्ता नागरिकांच्या दैनंदिन ये-जा


“आदेश कागदावरच; शहरातील विद्युत डीपी अजूनही झाडाझुडपांच्या विळख्यात!”

मान्सूनपूर्व कामांचा फज्जा; महावितरणाच्या निष्काळजीपणामुळे दुर्घटनेची भीती

करण्याचा प्रमुख मार्ग आहे. त्यामुळे फांदी कोसळली त्यावेळी एखादा नागरिक, दुचाकीस्वार किंवा बालक तेथे असता तर मोठी दुर्घटना घडली असती.

वादळामुळे तुटलेली फांदी थेट विद्युत वाहक तारांवर पडल्याने डीपीमध्ये शॉर्टसर्किट झाले. त्यानंतर डीपीभोवती वाढलेल्या कोरड्या गवताने आणि झाडाझुडपांनी पेट घेतला. काही क्षणांतच आगीचे लोळ उठल्याने परिसरात घबराट पसरली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत पाण्याच्या सहाय्याने आग आटोक्यात आणली. नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे मोठे नुकसान टळले.

विशेष म्हणजे, याच डीपीभोवती वाढलेल्या झाडाझुडपांबाबत आणि सुरक्षेच्या प्रश्नाबाबत 'हिंदू प्रकाश वार्ता'ने यापूर्वी वृत्त प्रकाशित करून महावितरणचे लक्ष वेधले होते. मात्र त्यानंतरही साफसफाई, फांद्यांची छाटणी आणि आवश्यक सुरक्षा उपाय करण्यात आले नसल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून शहरातील अनेक भागांत विद्युत तारांना झाडांच्या फांद्यांचा विळखा पडलेला आहे. अनेक डीपीभोवती गवत आणि झाडाझुडपे

-> पान 2 वर

# सं पा द की य

## विद्यार्थ्यांचे बळी घेणारी 'कोचिंग' संस्कृती आणि प्रशासकीय अंधार

उत्तर प्रदेशातील लखनौच्या अलिगंजमधील पुरानिया परिसरात एका तीन मजली इमारतीला लागलेली भीषण आग आणि त्यात चौदा निष्पाप विद्यार्थ्यांचा झालेला दुर्दैवी मृत्यू ही केवळ एक दुर्घटना नाही, तर तो थेट प्रशासकीय निष्काळजीपणाचा आणि मानवी क्रूरतेचा कळस आहे. स्पर्धा परीक्षांचे आणि उज्ज्वल भविष्याचे स्वप्न डोळ्यात घेऊन घराबाहेर पडलेल्या या कोवळ्या मुलांना मृत्यूच्या जबड्यात ढकलले गेले आहे. ज्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर हे कोचिंग सेंटर सुरू होते, तिथे लागलेल्या आगीनंतर विद्यार्थ्यांनी स्वतःला वाचवण्यासाठी बाथरूममध्ये कोंडून घेतले. मात्र, तिथेच गुदमरून त्यांचा अंत झाला, हे ऐकूनही अंगावर काटा येतो. जीव वाचवण्यासाठी पहिल्या मजल्यावरून उडी मारणारा विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून चार जण मृत्यूशी झुंज देत आहेत. या अत्यंत वेदनादायी घटनेने पुन्हा एकदा देशभरातील कोचिंग क्लासेसच्या इमारतींमधील सुरक्षेचा आणि नियमांच्या ऐरणीचा प्रश्न अत्यंत गंभीरपणे समोर आणला आहे. या संपूर्ण दुर्घटनेचा अभ्यास केला, तर यामागे नेमका काय नियम सांगतो आणि चूक कोणाची आहे, याचे विदारक चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. नियमांचा विचार केला तर, कोणत्याही व्यावसायिक इमारतीमध्ये किंवा जिथे शेकडो विद्यार्थी एकत्र येतात अशा शैक्षणिक कोचिंग सेंटरमध्ये 'अग्निसुरक्षा नियमावली'चे तंतोतंत पालन करणे कायद्याने बंधनकारक आहे. नियमानुसार, अशा इमारतींना अग्निशमन दलाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' असणे अनिवार्य आहे. इमारतीमध्ये आणीबाणीच्या प्रसंगी बाहेर पडण्यासाठी दोन स्वतंत्र मार्ग असावे लागतात. तसेच प्रत्येक मजल्यावर आग विझवणारी यंत्रणा, पाण्याचे स्प्रिंकलर्स आणि धूर शोषून घेणारे व्हेंटिलेशन असणे कायद्यानुसार आवश्यक आहे. व्यावसायिक इमारतींच्या पायऱ्या या पुरेशा रुंद असाव्या लागतात, जेणेकरून धावपळ झाल्यास चेंगराचेंगरी होणार नाही. मात्र, लखनौच्या या इमारतीमध्ये यातील एकाही नियमाचे पालन झाले नसल्याचे प्राथमिक दृश्यावरून स्पष्ट होते; कारण अग्निशमन दलाच्या जवानांना मृतदेह बाहेर काढण्यासाठी इमारतीची मागची भिंत तोडावी लागली. जर तिथे आपत्कालीन दरवाजा असता, तर कदाचित या निष्पाप मुलांचे प्राण वाचले असते. आता मूळ प्रश्न येतो की, या भीषण दुर्घटनेत नेमकी चूक कोणाची? तर याची पहिली आणि मुख्य चूक ही या कोचिंग सेंटरच्या व्यवस्थापनाची आणि इमारत मालकाची आहे. केवळ पैशांच्या हव्यासापोटी, सुरक्षेची कोणतीही मानके पूर्ण न करता, कोंदट आणि धोकादायक जागेत शेकडो विद्यार्थ्यांचे वर्ग भरणे हा फौजदारी गुन्हाच आहे. पण त्याहून मोठी चूक आणि पाप हे स्थानिक प्रशासन, महानगरपालिका आणि अग्निशमन विभागाचे आहे. डोळ्यांवर पट्टी बांधून अशा बेकायदेशीर आणि असुरक्षित इमारतींना परवानगी कशी दिली जाते? दरवर्षी या इमारतींचे सुरक्षा ऑडिट का केले जात नाही? स्थानिक अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट आशीर्वादामुळेच असे मृत्यूचे सापळे शहराच्या मध्यवस्तीत उभे राहतात आणि कार्यरत राहतात. त्यामुळे या दुर्घटनेची खरी जबाबदारी ही त्या लाचखोर यंत्रणेची आहे, जी पैशांसाठी नियमांकडे कानाडोळा करते. घटनेनंतर मुख्यमंत्र्यांनी आपले कार्यक्रम रद्द करून धाव घेणे, उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देणे आणि उपमुख्यमंत्र्यांनी कठोर कारवाईचे आश्वासन देणे, या नेहमीच्या प्रशासकीय बाबी आहेत. चौकशी समित्या नेमून आणि अहवाल मागवून आजवर कोणतीही मोठी यंत्रणा बदललेली नाही, हा इतिहास आहे. अशा दुर्घटना घडतात, काही दिवस चर्चा होते आणि नंतर पुन्हा सर्व काही विस्मरणात जाते. जोपर्यंत बेकायदेशीर कोचिंग सेंटर्स चालवणारे मालक आणि त्यांना पाठीशी घालणारे महापालिकेचे अधिकारी यांच्यावर थेट सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करून त्यांना तुरुंगात डांबले जात नाही, तोपर्यंत अशा घटना थांबणार नाहीत. लखनौच्या या अग्नितांडवाने देशातील सर्वच शहरांमधील कोचिंग क्लासेसच्या सुरक्षेचा प्रश्न अधोरेखित केला आहे. आता केवळ लखनौपुरती कारवाई न करता, संपूर्ण राज्यातील आणि देशातील प्रत्येक कोचिंग सेंटरचे कडक सुरक्षा ऑडिट करून नियम धाब्यावर बसवणाऱ्या संस्था तात्काळ सील करणे, हीच या मृत विद्यार्थ्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

## बातमीचा दणका! वादग्रस्त पाटी गायब; तरी बाजार समितीत घाणीचे साम्राज्य कायम

पान 1 वरून ->

झालेली गंभीर परिस्थिती उघड करण्यात आली होती. या वृत्तानंतर प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम सुरू करत आंबा मार्केट परिसरातील कुजलेल्या आंब्यांचे ढिगारे हटवले. त्यामुळे दुर्गंधीचा त्रास काही प्रमाणात कमी झाला असला तरी संपूर्ण बाजार समिती अजूनही स्वच्छ झालेली नसल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे, ज्या बाजार समितीत दररोज हजारो शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांची वर्दळ असते, त्याच परिसरातील अनेक रस्ते, गाळे आणि व्यापारी विभागांमध्ये अजूनही नारळाच्या करवंट्या, फळभाज्यांचा कचरा, प्लास्टिक आणि टाकाऊ साहित्याचे ढिगारे दिसून येत आहेत. ज्या ठिकाणी साफसफाई करण्यात आली, त्यापासून काही अंतरावरच पुन्हा कचरा साचलेला असल्याने ही मोहीम केवळ तात्पुरती की कायमस्वरूपी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

वृत्ताचा थेट परिणाम म्हणून सडलेल्या आंब्यांचे ढिगारे हटविण्यात आले, कुजलेल्या फळांचा कचरा साफ करण्यात आला, वादग्रस्त बुकिंगची पाटी काढण्यात आली आणि स्वच्छता मोहिमेला सुरुवात झाली. मात्र दुसरीकडे अनेक भागांमध्ये अजूनही घाण कायम असून पावसाळ्यात रोगराईचा धोका कमी झालेला नाही. त्यामुळे केवळ दिखाऊ कारवाई न करता संपूर्ण बाजार समिती कचरामुक्त करण्याची मागणी शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांकडून होत आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर साचलेल्या कचऱ्यात पावसाचे पाणी मिसळल्यास दुर्गंधी, डास-माशांचा प्रादुर्भाव आणि विविध संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्वच्छता ही केवळ देखाव्याची बाब नसून सार्वजनिक आरोग्याशी निगडित गंभीर विषय असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

लाखो रुपयांची उलाढाल करणारी आणि हजारो शेतकऱ्यांच्या अर्थकारणाशी जोडलेली बाजार समिती पूर्णपणे कचरामुक्त कधी होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अखेर दुर्घटना घडलीच : 'हिंदू प्रकाशवार्ता'च्या इशाऱ्यानंतरही महावितरण झोपेत

पान 1 वरून ->

वाढलेली आहेत. त्यामुळे शॉर्टसर्किट, आग आणि अन्य गंभीर दुर्घटनांचा धोका कायम आहे. काही ठिकाणी वाढलेल्या झाडाझुडपांमुळे दुरुस्ती व देखभालीसाठी कर्मचाऱ्यांना डीपीपर्यंत पोहोचणेही कठीण होत आहे.

या घटनेनंतर नागरिकांनी महावितरणने तातडीने सर्व डीपी आणि विद्युत वाहिन्यांची पाहणी करून धोकादायक झाडांच्या फांद्या छाटाव्यात, डीपीभोवतीची झाडाझुडपे हटवावीत आणि सुरक्षेचे निकष काटेकोरपणे पाळावेत, अशी मागणी केली आहे.

# नक्षलवाद 1967-2026, संविधानविरोधी आव्हानाचा शेवट

**जवळजवळ 60 वर्षे चाललेल्या ह्या डाव्या देशविरोधी मोहिमेतून काही धडे घेणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेन्द्र मोदींनी लाल किल्ल्यावरुन जाहीर भाषणात सांगितल्याप्रमाणे गुलामगिरीची मानसिकता झुगारुन देणे आवश्यक आहे. 1935 मधे भारतीय घटना बनवताना इंग्रजांनी जाणुन बुजुन कायदा व सुव्यवस्था हा विषय राज्यांच्या अखत्यारीत राहील अशी तरतूद केली. 1950 च्या घटनेनेही तीच तरतूद कायम ठेवली. 'भारत तेरे तुकडे होंगे' म्हणणाऱ्या देशविरोधी ताकदी नेहमीच अशा राज्यांच्या शोधात असतात जिथे त्यांना अभय मिळेल व देशविघातक कारवायांना खतपाणी मिळेल. त्यामुळे देश विघातक कारवाया कोणत्याही राज्यात चालू असतील तर तिथे केन्द्रीय दलांना, देश एकसंध ठेण्यासाठी आवश्यक कारवाई करण्यास घटनात्मक अधिकार दिले पाहिजेत. सध्या गुन्हे झाल्यानंतर NIA तपास करते, पण गुन्हे होऊच नयेत म्हणून नवी तरतूद आवश्यक आहे.**

जगातील अनेक देशांवर नजर टाकल्यास राष्ट्र म्हणून हे देश अयशस्वी झाल्याचे दिसते. विशेषतः भारताच्या शेजारचे देश पूर्णतः कोलमडलेले दिसतात. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित धोवाल ह्यांनी एकदा ह्याचे विस्लेषण करताना सांगितले होते की कुठल्याही परकीय आक्रमणामुळे हे देश कोलमडले का? त्याचे उत्तर नाही असे आहे. अतर्गत सुरक्षा राखता न आल्यामुळे हे देश अपयशी ठरले आहेत. ह्या पार्श्वभूमीवर भारतात सुद्धा 2014 पूर्वी वेगळी परिस्थिती नव्हती. काश्मिर, पंजाब, अष्टलक्ष्मी भाग, दंडकारण्यातील पशुपतीपासून तिरुपती पर्यंत ची 11 हून अधिक राज्ये इथली अंतर्गत सुरक्षा धोक्याच्या पातळीवर आलेली होती. 2047 पर्यंत देशात गझवा -ए- हिंद स्थापन करायचे मनसुबे जिहादींनी जाहीर केलेले होते. तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग ह्यांनी 2011 मधे जाहीर रीत्या सांगितले की नक्षलवाद हा भारतातील सर्वात मोठा अंतर्गत सुरक्षेला असलेला धोका आहे. भारत हा एकसंध राहील किंवा कसे असा प्रश्न पडला होता. त्यावेळी 2014 मधे समंजस भारतीय नागरिकांनी लोकशाही मार्गाने देशाची धुरा नरेन्द्र मोदींकडे सोपवली. मोदींच्या प्रगल्भ नेतृत्वाखाली अंतर्गत सुरक्षेसामोरील वर उल्लेखिल्या सर्व आव्हानांवर देशाने यशस्वीरीत्या नियंत्रण मिळवलेले दिसते. त्यातील एक प्रमुख आव्हान म्हणजे नक्षलवाद. अशक्य वाटणारे हे कसे घडले ह्याचा राजकीय निरीक्षक पुढील अनेक वर्षे अभ्यास करत राहणार आहेत. त्याना मदत व्हावी ह्या उद्देशाने गृह मंत्री अमित शाह ह्यांच्या भाषणाचा अभ्यास महत्वाचा आहे.

सुपरिचित नारद ऋषी व जंगलातील नाग ह्यांची कथा आठवण्यासारखी आहे. नारदांनी नागाला सांगितले तू लोकांना चावू नकोस. नागाने ऐकले व येणारा जाणारा नागाला त्रास देऊ लागला. नारद परत आले व नागाला म्हटले मी तुला फुस करायला बंदी केली नव्हती. भारतातील पोलीस, सुरक्षा दले ह्यांची अवस्था अशीच होती. एकेका वेळेस 76 सुरक्षा कर्मचारी नक्षल्यांनी ठार मारले तरीही केन्द्रीय गृहमंत्री सांगत होते, नक्षल्यांनी शस्त्रे खाली ठेवावीत असे मी त्यांना सांगणार नाही. अमित शहा ह्यांनी त्याच सुरक्षा दलांचे मनोधैर्य वाढवले व हा चम्रत्कार पाहण्याचे भाग्य आपणा सर्वांना मिळाले. 30 मार्च रोजी लोकसभेत गृह मंत्री अमित शाह ह्यांनी निवेदन केले की भारतातील व विशेषतः छत्तिसगड मधील नक्षलवाद संपुष्टात आणण्यात स्थानिक वनवासींच्या मदतीने केन्द्रीय पोलीस दले, राज्य पोलीस दले ही यशस्वी झाली आहेत. नक्षलवादावरील प्रहाराचा आढावा घेताना गृह मंत्र्यांच्या वक्तव्यातील महत्त्वाच्या मुद्द्यांचा पुनरुच्चार करणे आवश्यक आहे.

गेल्या 12 वर्षात पंतप्रधान नरेन्द्र मोदींच्या तीव्र राजकीय निर्धारयुक्त नेतृत्वात विकासासाठी अनेक पावले उचलण्यात आली व माओवाद मुळापासून उखडून टाकण्यात आला. पंतप्रधान मोदींनी ह्याबद्दल दिलेली माहिती त्यांच्या नुकत्याच केलेल्या 22 जून 2026 रोजीच्या भाषणातून स्पष्ट होते, **https:**//www.youtube.com/watch?v=tMuuRwc3OHY).

त्यात सुरक्षेचे विविध उपाय, नक्षल्यांची आर्थिक गळचेपी, व गेल्या 12 वर्षात अखंडपणे केलेली विविध विकासाची कामे ह्यांचे महत्वाचे योगदान आहे. गृह मंत्री अमित शाह ह्यांनी सागितल्याप्रमाणे 31 मार्च 2026 ला भारतातील नक्षलवाद संपविण्यात आला. ह्यासाठी अमलात आणलेल्या महत्वाच्या घटनांचा उल्लेख करणे अवश्यक आहे. 2022मध्ये झारखंड मध्ये बुद्ध पहाड येथे कारवाई करून गुमला, लोहारडागा व लाटेहार जिल्हे नक्षलमुक्त करण्यात आले. 2022 सालीच operation Thunderstorm मधे नक्षलग्रस्त सेराइकेला, पस्चिम सिंहभुम, व खुन्ति जिल्हे नक्षलमुक्त करण्यात आले. 2025 मधे, तेलंगाणा व छत्तिसगड सीमेवरील 50 किलोमीटर लांब व 37 किलोमीटर रुंद डोंगरावर Operation Black Forest मार्फत तेथील नक्षल कारवायांवर प्रहार करण्यात आला. ह्याच बरोबर NIA ने नक्षल्यांच्या आर्थिक स्रोतांवर कारवाई करून त्यांची रसद बंद पाडली. ED ने 11 जुन 26 रोजी बेंगलुरु येथील कोठनुर पो स्टे. मधे अमेरिकेतील बँकेची डेबिट कार्ड्स वापरून परदेशी निधी चा गैरवापर केल्याबद्दल गुन्हा दाखल केला. त्यात 92.55 कोटींचा निधी नोव्हेंबर 25 ते एप्रिल 26 चया काळात गैरकायदेशीर मार्गासाठी वापरल्याचे उघडकीस आले आहे. त्यातील 6.5 कोटी छत्तिसगडमधील नक्षल चळवळीसाठी वापरल्याचा आरोप आहे. आता त्याविरुद्ध कठोर कारवाई होत आहे. हयाशिवाय, केन्द्र सरकारने 761 कोटी रुपये देउन विशेष दले, राज्यातील गुप्तवार्ता केन्द्रे व जिल्हा पोलीस ह्यांची बळकटी केली. 596 नवीन पोलिस ठाणी बनवण्यात आली. गडचिरोलीत तर 24 तासात अभेद्य पोलीस स्टेशन बांधण्यात आले.

नक्षल मुक्त भारत हा भारतातील लोकशाहीचा, विकासाच्या प्रयत्नांचा व राज्यघटनेने गेली 6 दशके चाललेल्या हिंसात्मक कारवायांवरील विजय आहे.

अनेक ठिकाणांची उदाहरणे देऊन गृह मंत्र्यांनी स्पष्ट केले की, अन्यायामुळे, गरीबीमुळे दंडकारण्य भागातील 12 कोटी जनतेत नक्षलवाद फोफावला हे खरे नाही तर नक्षलवाद्यांनी प्रयत्नपूर्वक हा भाग प्रगती होण्यापासून वंचित ठेवला. ह्या भागात नक्षलवाद सुरु रहावा, ह्यासाठी एकीकडे तत्कालीन पंतप्रधान, नक्षलवाद हा अंतर्गत सुरक्षेला सर्वात मोठा धोका आहे, असे जाहीर करतात, त्याच वेळेस केन्द्रीय सुरक्षा दलाच्या 76 जावानांना ठार मारले जाते, तरीही त्यावेळचे गृह मंत्री सांगतात की 'मी नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवावीत असे त्यांना सांगणार नाही', अंतर्गत सुरक्षेला उघडपणे आव्हान देणाऱ्यांना हे प्रोत्साहनच होते असे म्हणणे भाग आहे. पंतप्रधान संशोधन शिष्यवृत्ती ही नक्षलवाद्यांसाठी काम करणाऱ्याला देण्यात यावी असे त्यावेळेस सत्तेत असणाऱ्या वरिष्ठ खासदाराने राज्य सरकारला पत्र लिहिले. भारत सरकारचे धोरण ठरवण्यासाठी National Advisory Council ही पूर्णपणे extra constitutional authority स्थापण्यात आली. कोणतेही शासकीय पद नसताना सोनिया गांधी ह्या त्या संस्थेच्या अध्यक्ष झाल्या, ज्यांना, न्यायालयाने, नक्षलवाद्यांना प्रोत्साहन दिले ह्या गुन्हयासाठी शिक्षा ठोठावली ते, अन्य एका नक्षलवाद्याची पत्नी, प्रशासनात राहून डाव्या चळवळीला मदत करणारे व छत्तिसगड मधे प्रशासकीय अधिकारी म्हणून काम पाहणारे, केम्ब्रिज मधे शिकलेले गृहस्थ हे सगळे त्या घटनाबाह्य संस्थेचे सदस्य नक्षलवाद विरुद्ध धोरण ठरवणार. त्यामुळे केन्द्रीय पोलीस दले आणि राज्य पोलीस दलेही त्यांचे हात बांधल्यासारखेच वागत होते. 2019 ते 2024 पर्यंत छत्तिसगड मधे सत्तेत असणाऱ्या सरकारने नक्षल्यांचा बालेकिल्ला असलेल्या अबुजमाड येथे नगण्य कारवाई केली. 2024 नंतरही तेलंगाणा मधे असलेल्या सत्तेत असणाऱ्या सरकारने आम्ही आमच्या राज्यातील नक्षली उत्तरेकडे जाणार नाहीत एवढी काळजी घेऊ पण केंद्रीय मोहिमेत भाग घेणार नाही असे जाहीर केले. मधल्या काळात, बंदुकीच्या नळीतून मारलेल्या गोळीनेच आम्ही सत्ता काबीज करू हे नक्षली वारंवार सांगत होते, त्यांच्या समर्थनार्थ बुद्धिजीवींनी लिहलेले 2000 हून अधिक लेख प्रकाशित करण्यात आले, परंतु नक्षल्यांच्या अत्याचाराला बळी पदलेल्यांच्या समर्थनार्थ एकही लेख लिहावा असे कोणाला वाटले नाही. जिथे जमेल तिथे 12 हून अधिक राज्यात पोलीस स्टेशन्स वर हल्ले करून तिथली शस्त्रे, दारूगोळा लुटला जात होता. नक्षल्यांकडे असलेल्या शस्त्रांपैकी 92 टक्के शस्त्रे ही अशी लुटलेली होती. हिंसाचार करून पाड्यात राहणाऱ्या, पण नक्षल्यांना सहकार्य न करणाऱ्या सामान्य नागरिकांना, खंडणी न देणाऱ्या कंत्राटदारांना, राजकीय व्यक्तींना, पोलीस अधिकाऱ्यांना ठार मारण्यात येत होते. अशा प्रकारे 20,000 निष्पाप लोकांना नक्षल्यांनी चालवलेल्या स्वतःच्या न्यायालयात दोषी ठरवून फाशी देण्यात आले व त्यांची प्रेते गावाच्या वेशीवर टांगून ठेण्यात येत होती. नक्षल्यांनी अपंग केलेले हजारो लोक आजही याची साक्ष देत आहेत. 7-8 वर्षांची लहान मुले, मुली ह्याना जबरदस्तीने पळवून नेऊन नक्षल करण्यात येत होते व त्यांच्या हातात बंदूक देऊन गोळिबार करायला लावला जात होता. LTTE च्या मदतीने तेलंगाणा व ओरिसा ह्यांच्या सीमेवर improvised explosive devices (ied) ह्याचा कारखाना सुरु केला होता. रस्त्याच्या खाली 20 फूट ही स्फोटके ठेवायची, पोलीस वाहन आले की remote control ने हे वाहन उडवायचे, कोणी जिवंत असल्यास बेछूट गोळीबार करून त्यांना ठार मारायचे हे नेहमीचेच झाले होते. रस्ते पूल बांधायला आणलेली कोट्यवधींची मशिनरी, वाहने जाळायची व ह्या भागातील लोकांचा बाहेरील जगाशी संपर्क येऊ द्यायचा नाही व त्यांना सतत दहशतीमधे रहायला भाग पाडायचे.

70 रीच्या दशकात ब्रह्मदत्त शर्मा बस्तरचे जिल्हाधिकारी होते. त्यांनी बाहेरच्या लोकांना बस्तरमध्ये जायला बंदी केली. त्यामुळे बस्तर मध्ये असलेल्या सर्व रस्ते, रुग्णालये कार्यालये बंद पडली. अशी ही प्रशासन नसलेली सर्व जागा नक्षल्यांना त्यांचा बालेकिल्ला बनवायला फारच सोईस्कर झाली. व त्यांनी स्थनिक लोकांवर अनन्वित अत्याचार करायला सुरवात केली.

2024 मधे छत्तिसगडमधे सत्ता परिवर्तन झाले व केंद्रीय गृह मंत्र्यांनी नवीन व्यूह रचना केली. दंडकारण्यातील नक्षल भागावर नियंत्रण मिळवण्यासाठी Central Command ची स्थापना करण्यात आली, केन्द्रीय सुरक्षा दलांच्या प्रमुखांना राज्य पोलीस दलांशी समन्वय वाढवण्यासाठी बस्तर, झारखंड भागातच राहण्यास सांगण्यात आले. 31 मार्च 2026 पर्यंत शस्त्रे खाली ठेवा, आत्मसमर्पण करा अन्यथा पोलीस कारवाईमधे तुम्हाला ठार मारले जाईल असा निर्वाणीचा पण सुस्पष्ट संदेश देण्यात आला. गृह मंत्र्यांनी ह्या संदेशाचा पुनरुच्चार करून शस्त्रधारींशी कोणतीही बोलणी होणार नाहीत हे वारंवार सांगितले. तरीही शस्त्रे खाली न ठेवणार्या सुमारे 500 नक्षल्यांना यमसदनी पाठवण्यात आले, 2000 जणांना पकडून तुरुंगात ठेवण्यात आले, 5000 जणांनी आत्मसमर्पण केले, व ही प्रक्रिया अजूनही चालूच आहे. नक्षल्यांच्या केन्द्रीय समितीतील 21 पैकी केवळ एक सध्या बाहेर आहे पण लवकरच तो आत्मसमर्पण करेल अशी अपेक्षा आहे. सर्व वरिष्ठ नेतृत्वच पोलीस कारवाईत समाप्त झाल्यामुळे त्यांच्या हजारो पाठीराख्यांनीही शस्त्रांसकट आत्मसमर्पण केले व शांततेचे कौटुम्बिक आयुष्य जगण्यास प्राधान्य दिले.

जवळजवळ 60 वर्षे चाललेल्या ह्या डाव्या देशविरोधी मोहिमेतून काही धडे घेणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेन्द्र मोदींनी लाल किल्ल्यावरून जाहीर भाषणात सांगितल्याप्रमाणे गुलामगिरीची मानसिकता झुगारून देणे आवश्यक आहे. 1935 मधे भारतीय घटना बनवताना इंग्रजांनी जाणुन बुजुन कायदा व सुव्यवस्था हा विषय राज्यांच्या अखत्यारीत राहील अशी तरतूद केली. 1950 च्या घटनेनेही तीच तरतूद कायम ठेवली. 'भारत तेरे तुकडे होंगे' म्हणणाऱ्या देशविरोधी ताकदी नेहमीच अशा राज्यांच्या शोधात असतात जिथे त्यांना अभय मिळेल व देशविघातक कारवायांना खतपाणी मिळेल. त्यामुळे देश विघातक कारवाया कोणत्याही राज्यात चालू असतील तर तिथे केन्द्रीय दलांना, देश एकसंध ठेण्यासाठी आवश्यक कारवाई करण्यास घटनात्मक अधिकार दिले पाहिजेत. सध्या गुन्हे झाल्यानंतर NIA तपास करते, पण गुन्हे होऊच नयेत म्हणून नवी तरतूद आवश्यक आहे.

भौगोलिक परिस्थिती, व साधनांची कमतरता ह्यामुळे दंडकारण्य भागात प्रगती होऊ शकली नाही असे समजले जाते ते अंशतः खरे आहे. मुळात भारतातील इंग्रजांची सत्ता कायम रहावी म्हणून फोडा व सत्ता करा हे इंग्रजांचे तत्व होते. त्याप्रमाणे वनवासी हे भारतातील मूळ निवासी आहेत, त्यांच्यात कोणत्याही प्रकारे बाहेरील विकास न करता त्यांना जसे आहेत तसे राहून देणे गरजेचे आहे असे धोरण जाणुन बुजून इंग्रजांनी बनवले होते. स्वातंत्र्यानंतर सत्तेत आलेल्या व केंब्रिजमधे हेच धडे शिकून आलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपल्या सत्तेचा गैरवापर करून बस्तर मधे भारतातील अन्य लोकांना तिथे जाण्यापासून बंदी केली. त्याच वेळी, ख्रिश्चन मिशनरींना मात्र तिथे धर्म प्रचार करायला, आदिवासी लोकांच्या समजुतींचा गैरफयादा घेऊन त्यांचे धर्मांतरण करायला मोकळीक होती. हे तिथे राहून विकास होत नाही म्हणुन लोकांना चिथावत रहायचे व चीनच्या प्रेरणेने स्वतःला माओवादी म्हणवणारे भारतीय राज्यघटना आम्ही मानत नाही व शस्त्राच्या जोरावर सत्ता काबीज करायला पाहिजे असा प्रचार करून त्यांना विरोध करणाऱ्यांना ठार मारत होते, भोळ्या भाबड्या वनवासींना तुमची जमीन, तुमची खनिजे, तुमचे पाणी बाहेरील लोक पळवतील अशी भीती दाखवून त्यांच्यात देशविरोधी चळवळ चालवून जन्ता सरकार नावाखाली अत्याचार करत होते. ह्या दुष्टचक्रामुळे प्रशासनातील कोणीही व्यक्ती ह्या भागात काम करायला जात नसे व गेल्यास त्यांना पगारातून ठराविक रक्कम दर महिन्याला नक्षलवाद्यांना द्यावी लागत असे. पोलिसांनी कारवाई केल्यास सत्ताधाऱ्यांच्या जवळचे वकील न्यायालयात PIL करून, मानवाधिकाराच्या नावाखाली पोलिसांचे मनोधैर्य खच्ची करत होते. कुठेही रस्ते होऊन द्यायचे नाहीत, पूल नाहीत, आरोग्य सेवा नाही शाळा नाहीत. स्थानिक लोकांना धाकात ठेवून त्यांच्याकडून स्वतःच्या सगळ्या सोई करून घ्यायच्या, कोणी तयार नसल्यास, त्यांची निर्घृणपणे हत्या करायची. ह्या अत्याचाराला कंटाळून वनवासींनी नक्षल्यांना झुगारून नवीन भरती बंद केली व ते पोलिसांच्या बरोबरीने नक्षल्यांशी लढायले पुढे आले. चीनचा उदोउदो करत भारतीय संविधान नाकारणाऱ्या माओवाद्यांनी नक्षलग्रस्त भागात मानवाधिकाराच्या आडून पोलिसांचे मनोधैर्य खच्ची केले, आदिवासीवर अमानुष अत्याचार केले. ह्या उलट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी संकटकाळातही अविरत सेवाकार्य चालवून जनजाती समाजात उत्थानासाठी आपले योगदान दिले. ह्या लढ्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हजारो कार्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे केलेले योगदान हा अभ्यासाचा वेगळा विषय आहे. ते संकलीत करून प्रकाशन करणे आवश्यक आहे.

येणाऱ्या काळात ही अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून 1 एप्रिल पासून केन्द्र व राज्य सरकारांनी 137 विविध कल्याणकारी योजना राबवण्यासाठी सुरवात केली आहे. तरुणांना कौशल्ये देऊन रोजगार, स्वयंरोजगारास सिद्ध करण्यात येत आहे. शेती, फलोत्पादन ह्यात मदत करण्यात येत आहे. विमान तळ, रेल्वे, रस्ते, बँका, यांचे जाळे निर्माण करून बाजारापर्यंत पोचण्यास मदत करण्यात येत आहे. सर्वत्र आंतर्जालाची सोय करण्यात येत आहे. त्याच बरोबर नक्षल्यांना मदत करणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. पुढील 18 महिने केन्द्रीय सुरक्षा दले ह्या भागात कायम राहणार आहेत. विकासासाठी उद्योगांमधे वनवासींना मालकी हक्क देण्यात येत आहेत. तरुणांना सांस्कृतिक कार्यशाळा, खेळ,पर्यटन ह्यात प्राधान्य देण्यात येत आहे. ह्या वर्षीच्या बस्तर ऑलिम्पिकमधे 4 लाख हून अधिक तरुण, तरुणींनी भाग घेतला होता. पोलिसांना विकासोन्मुख बनण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. ह्या सुशासनामुळे येणाऱ्या काळात शहरी नक्षलवाद्यांचाही बीमोड होणार आहे.

त्यामुळे 2047 पर्यंत भारताला विकसित देश बनवण्यात दंडकारण्यातील 12 कोटी वनवासी मोठे योगदान देतील ह्यात शंका नाही.

**- प्रवीण दीक्षित**
निवृत्त पोलीस महासंचालक

## शासन मान्य अनुदानित आश्रम शाळा संघटना...

पान 1 वरून ->

करून संघटनेचा थोडक्यात इतिहास सांगून व सर्वांचा परिचय करून केली, त्यानंतर आदरणीय प्रकल्प अधिकारी चेतना मोरे मॅडम यांचा सत्कार राज्य कार्याध्यक्ष साहेबराव मोहोड सर व सर्व कार्यकारणी तर्फे करून करण्यात आली, यानंतर राज्य कार्याध्यक्ष साहेबराव मोहोड सरांनी विविध समस्या प्रकल्प अधिकारी मॅडम यांच्या समोर मांडून केली यात दरमहा होणारा वेतन विलंब यावर सविस्तर चर्चा करण्यात आली, यामध्ये दरमहा 15 ते 25 तारखेपर्यंत सर्व शाळांचे वेतन बिल मागवून घ्यावे व 26 तारखेला ज्या शाळेचे बिल येईल ते स्वीकारू नाही असे ठरले, त्यानंतर सेवा पुस्तकाचा मुद्दा घेण्यात आला, काही शाळेत सेवा पुस्तकं नाहीत व ते अद्यावत करून द्वितीय प्रत सदरील कर्मचाऱ्यांना देण्यात यावे व अपडेट करावीत असा मुद्दा घेण्यात आला, यानंतर DCPS व Gpf चा मुद्दा पावत्या व हिशोब देण्यात यावा असे ठरले, यानंतर पात्र कर्मचारी यांचे वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी चे प्रस्ताव शाळाना मागवून घ्यावे व वरिष्ठ कार्यालयात पाठवावे असे ठरले, Ptsd निवृत्ती ची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यात यावीत असे ठरले, मेडिकल बिल वेळेवर काढण्यात यावेत असे ठरले, ज्या शाळेत अधीक्षक व अधिक्षिका पदे रिक्त असतील तिथे पदभरती तात्काळ करून घ्यावी अशी मागणी करण्यात आली, पहारेकरी पद दोन अनुदानित मध्ये रिक्त आहे ते भरण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली, ऐनवेळी आलेले विषय सुद्धा घेण्यात आले, आभार प्रदर्शन राज्य सदस्य जितेंद्र सोळुंके सरांनी केले तर राज्य कार्यकारणी तर्फे आभार राज्य प्रसिद्धी विभाग प्रमुख संजय देशमुख सरांनी मानले.

## गुलमंडीत रॉंग साईडवाल्यांना दणका...

पान 1 वरून ->

दंड वसूल करण्यात आला आहे.

गुलमंडी ही शहरातील प्रमुख व्यापारी बाजारपेठ असून येथे दररोज हजारो नागरिक खरेदीसाठी येत असतात. त्यामुळे परिसरात वाहतुकीचा मोठा ताण असतो. पेणगेट ते बाराभाई तिजोरिया, सिटी चौक ते सुपारी हनुमान मंदिर, गोमटेश मार्केट तसेच गांधी पुतळा ते सिटी चौक या मार्गांवर एकेरी वाहतुकीची व्यवस्था लागू असतानाही अनेक वाहनचालक विरुद्ध दिशेने वाहने चालवत असल्याचे वारंवार निदर्शनास येत होते. परिणामी वाहतूक कोंडी वाढून नागरिक, व्यापारी आणि ग्राहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते.

या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने २१ व २२ जून रोजी विशेष मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. मोहिमेदरम्यान एकेरी मार्ग आणि प्रवेशबंद रस्त्यांवर रॉंग साईडने वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. या कारवाईत १०२८ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करून सुमारे ७ लाख ७५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

## नोकरी लावून देतो म्हणत लावला 21 लाखांचा 'चुना'

पान 1 वरून ->

छत्रपती संभाजीनगरमधील कॅनॉट परिसर येथे भेटायला बोलावले. तिथे त्याने "मी तुझे पुरवठा निरीक्षक पदावर काम करून देतो, पण या कामाकरिता तुला २१ लाख रुपये द्यावे लागेल" असे सांगितले. संदीप यांनी आपली आर्थिक परिस्थिती बेताची असल्याचे सांगून एवढे पैसे देण्यास असमर्थता दर्शवली. त्यावर आरोपीने त्याच्या मोबाईलमधील अनेक उमेदवारांचे जॉइनिंग लेटर्स आणि मोठ-मोठ्या मंत्र्यांचे शिफारस पत्रे दाखवून संदीप यांना जाळ्यात ओढले. अर्धे पैसे आधी आणि अर्धे काम झाल्यावर देण्याचे ठरल्याने संदीप यांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसला. आरोपी अभिषेकची सासरवाडी छत्रपती संभाजीनगर येथे असून फारकतीचे प्रकरण न्यायालयात सुरू असल्याने त्याचे नेहमी शहरात येणे-जाणे असायचे. त्याने पैशांसाठी तगादा लावल्याने संदीप यांनी सुरुवातीला १ लाख रुपये फोन पेद्वारे दिले. त्यानंतर नातेवाईकांकडून उसने घेऊन १० लाख रुपये रोख आणि काही दिवसांतच उर्वरित १० लाख रुपये रोख, असे एकूण २१ लाख रुपये कॅनॉट प्लेस येथे अभिषेकच्या स्वाधीन केले. काही दिवसांनी परीक्षेचा निकाल लागला, मात्र त्यात संदीप यांचे नाव नसल्याने त्यांनी अभिषेकला संपर्क केला. त्यावर त्याने "दुसऱ्या ठिकाणी तुझे काम करून देतो" असे सांगून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील कनिष्ठ लिपिक पदाचा नियुक्ती आदेश दाखवून पैसे देण्यास टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. मात्र संशय आल्याने संदीप यांनी आपले २१ लाख रुपये परत मागितले. त्यावर आरोपीने त्याचा खरा चेहरा दाखवत, "तुला माहीत नाही मी कोण आहे, तुला कुठेही गायब करून टाकीन, माझे मोठ-मोठ्या मंत्र्यांसोबत उठणे-बसणे आहे, तुला काय करायचे ते कर" अशा धमक्या देण्यास सुरुवात केली. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित युवकाने सिडको पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या धक्कादायक प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक योगेश गायकवाड करत आहेत.

# वेरूळ, घृषणेश्वर मंदिर परिसरातीलअतिक्रमाणावर हातोडा





**वेरूळ:** वेरुळ, मंदिर परिसरातील अतिक्रमणांना सार्वजनिक बांधकाम विभागाची हटविण्यास सुरवात. घृष्णेश्वर मंदिर विकास आणि -२०२७ कुंभमेळा तयारी. जगप्रसिद्ध धार्मिक व पर्यटन स्थळ तथा श्रीक्षेत्र वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिर परिसराचा कायापालट करण्यासाठी सध्या मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असुन,आगामी -२०२७ नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांची होणारी अलोट गर्दी लक्षात घेता, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे.

परंतु अत्यंत महत्त्वाच्या विकासकामांना

अडथळा निर्माण करणारे मंदिर परिसरातील अतिक्रमीत बेकायदेशीर शेड आणि दुकानावर हातोडा पडला आहे.

प्रथमता मंदिरात परिसरातील अतिक्रम काढण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात वेरूळ गाव तसंच वेरूळ -खुलताबाद रस्त्यावरील अतिगम काढण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक बांधकाम उप-विभागाने आक्रमक पाऊल उचलले असून, सर्व अतिक्रमणधारकांना ७ दिवसांच्या आत स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याची अंतिम नोटीस बजावली होती. मुदतीत अतिक्रमण न हटवल्यास पूर्वसूचना न देता शासकीय यंत्रणेद्वारे कडक कारवाईचा इशारा अतिक्रमीत शेड व दुकानदार यांना देण्यात आला होता.

भुयारी मार्गाच्या (सुबवाय ) कामात मोठा अडथळा होता

वेरुळ ते खुलताबाद जंक्शन हा रस्ता 'राज्य मार्ग-२१६' (SH-216) दर्जाचा आहे. नियमानुसार रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूंना १५.०० मीटरपर्यंत रस्त्याची हद्द असणे अनिवार्य आहे. परंतु, अनेक व्यावसायिकांनी रस्त्याच्या मध्यापासून अवघ्या १० मीटर अंतरावरच्या अनधिकृत शेड, इमारती, हॉटेल्स आणि प्रसादाची दुकाने काढली आहेत.

## नरहरी शिवपुरे यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचा शेतीमित्र पुरस्कार जाहीर

**छत्रपती संभाजीनगर :** नरहरी नामदेवराव शिवपुरे यांनी गेल्या तीस वर्षांपासून ग्रामविकास संस्था, ग्रामविकास निधी बँक, लोकशिक्षण, मराठवाडा पाणी परिषद, मराठवाडा युवक विकास मंडळ, जलयुक्त शिवार अभियानासह विविध शासकीय समित्यांच्या माध्यमातून शेती, जलसंधारण, सिंचन ,फळबागा, सेंद्रिय शेती, शेती उत्पादकता , थेट शेतमाल विक्री, गटशेती, शेतकऱ्यांसाठी समन्यायी पाणी वाटपाचा यशस्वी लढा इत्यादी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून 25 हजार गावे व वीस लाखांहून अधिक शेतकरी, ग्रामस्थांचे जीवनमान उंचावण्याचे मोलाचे कार्य केले आहे.

नरहरी शिवपुरे यांच्या शेती, पाणी ,शाश्वत ग्रामविकास क्षेत्रांतील कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासन कृषी विभाग छत्रपती संभाजीनगर विभागाचा 2024 चा वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार नरहरी शिवपुरे यांना जाहीर झाला आहे. संबंधित पुरस्कार एक जुलै 2026 रोजी कृषी दिनानिमित्त वरळी, मुंबई येथे राज्यपाल विष्णू देव शर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, कृषी मंत्री, यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे .पुरस्कार मिळाल्याबाबत शिवपुरे यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत

### सामूहिक प्रयत्नांचा गौरव

**वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार हा माझा वैयक्तिक सन्मान नसून, मराठवाड्यातील लाखो शेतकरी, ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि सहकार्यांचा सामूहिक प्रयत्नांचा गौरव आहे. .गेली तीस वर्षे ग्रामविकास संस्थेच्या माध्यमातून शेती ,पाणी आणि शाश्वत ग्रामविकास क्षेत्रात केलेल्या कार्याची ही पावती आहे. यापुढील काळात शेती, पाणी क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे. या सन्मानाबद्दल मी महाराष्ट्र शासन व सर्व सहकार्यांचा ऋणी आहे .**

**नरहरी शिवपुरे सचिव**
**-ग्रामविकास संस्था**

## मध्यरात्री घरात घुसून विवाहितेच्या अब्रूवर उठला 'नराधम'; वाळूज पोलिसात गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज एमआयडीसी अंतर्गत येणाऱ्या रांजणगाव शेणपुंजी परिसरात एका नराधमाच्या विकृत कृत्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. घराच्या गॅलरीत कुटुंबासह झोपलेल्या एका २९ वर्षीय महिलेचा मध्यरात्रीच्या सुमारास विनयभंग करण्यात आल्याची धक्कादायक घटना आज, २३ जून रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, पीडित २९ वर्षीय विवाहिता ही रात्रीच्या वेळी आपल्या घराच्या गॅलरीमध्ये सासू आणि दोन लहान मुलांसह गाढ झोपलेली होती. दरम्यान, मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास परिसरातीलच नारायण सपकाळ नावाचा संशयित इसम दबा धरून गॅलरीत शिरला. महिला झोपेत असल्याचा फायदा उठवत त्याने तिच्या शरीराला अश्लील स्पर्श करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या चुकीच्या स्पर्शामुळे पीडित विवाहिता दचकून जागी झाली. तिने डोळे उघडून समोर पाहिले असता, तिला पतीऐवजी दुसराच पुरुष दिसला.

हा प्रकार पाहून ती प्रचंड हादरली आणि तिने मदतीसाठी आरडाओरड करण्यास सुरुवात केली. विवाहितेच्या आवाजामुळे शेजारी झोपलेली तिची सासू आणि मुलेही जागी झाली. आपले पाप उघडकीस आल्याचे आणि लोक जागे होत असल्याचे पाहून संशयित नारायण सपकाळ घाबरला. मात्र, पळून जाण्यापूर्वी त्याने पीडित महिलेला "जर या प्रकाराबद्दल कोणाकडे तोंड उघडले, तर जीवे मारून टाकीन," अशी कडक धमकी दिली आणि अंधाराचा फायदा घेत तिथून पोबारा केला. या संतापजनक प्रकारानंतर पीडितेने तात्काळ वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. विवाहितेच्या जबाबावरून पोलिसांनी संशयित आरोपी नारायण सपकाळ याच्याविरुद्ध विनयभंग आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार श्री. तांदळे करत असून पोलीस आरोपीच्या शोधात आहेत.

## जिल्ह्यात 'एकल महिला दिवस' उत्साहात; सक्षमीकरणासाठी ग्रामसभांमधून ठराव

### आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतींमध्ये विविध उपक्रम



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या वतीने मंगळवारी (दि. 23) जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये 'एकल महिला दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

राज्य शासनाकडून एकल महिला धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्याअनुषंगाने आंतरराष्ट्रीय विधवा दिन 'एकल महिला दिवस' म्हणून साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती व अंगणवाड्यांमध्ये विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहास ढोकणे तसेच महिला व बाल विकास विभागाच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ यांनी ग्रामपंचायती व अंगणवाड्यांमध्ये कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन केले होते.

कार्यक्रमांत 'विधवा' या शब्दाऐवजी 'एकल महिला' ही सन्मानजनक संज्ञा वापरत गावातील सर्व एकल महिलांना निमंत्रित करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा उपस्थितांना देण्यात आला.

यावेळी एकल महिलांसाठी रोजगार, स्वयंरोजगार व उपजीविकेच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बचत गटांमध्ये सहभागी नसलेल्या महिलांना बचत गटांशी जोडण्याचे आवाहन करण्यात आले. बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन आणि रोजगारनिर्मितीच्या संधींबाबत माहिती देण्यात आली.

ग्रामसभांमधून एकल महिलांना रूढी-परंपरांच्या नावाखाली कोणतीही अपमानास्पद वागणूक दिली जाणार नाही, याबाबत ठरावही मंजूर करण्यात आले. विविध विभागांच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून शासकीय योजना, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींबाबत माहिती दिली. कार्यक्रमानंतर उपस्थित महिलांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले.

## 'स्टॉप डायरिया' अभियानात सर्व ग्रामपंचायतींनी सक्रिय सहभाग घ्यावा : मिन्नू पी. एम.

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** पावसाळ्यात अतिसार (डायरिया) आजाराचे प्रमाण वाढू नये आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात १६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'स्टॉप डायरिया – अतिसार थांबवा' अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, शासकीय यंत्रणा आणि संबंधित विभागांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे.

जिल्ह्यातील शाळा, अंगणवाड्या आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध पिण्याच्या पाण्याची एफटीके (फिल्ड टेस्ट किट) द्वारे तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीत दूषित आढळणारे पाण्याचे नमुने पुढील विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविले जाणार आहेत. तसेच तालुकास्तरावर आणि गावपातळीवर व्यापक जनजागृती कार्यक्रम राबवून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.

या अभियानांतर्गत गावपातळीवर पाणी समित्यांची स्थापना व बळकटीकरण, पाण्याच्या स्रोतांची स्वच्छता, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावे ओडीएफ प्लस करण्यासाठी प्रयत्न, कार्यात्मक नळजोडणी वाढविणे, छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन, तसेच हातपंप दुरुस्ती यांसारख्या उपक्रमांवर भर देण्यात येणार आहे.

याशिवाय गावांमध्ये प्रभात फेऱ्या, जनजागृती रॅली, स्वच्छता अभियान आणि आरोग्यविषयक प्रबोधन कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छ पाणी, स्वच्छता आणि अतिसार प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, विविध शासकीय विभाग आणि स्थानिक संस्थांनी या अभियानात सहभागी होऊन ते यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कॅनॉट परिसरात दारुसोबत 'ताकद वाढविण्याची' गोळी खाल्ल्याने एकाचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील उच्चभ्रू आणि गजबजलेल्या टाऊन सेंटर, कॅनॉट परिसरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दारूचे सेवन केल्यानंतर ताकद वाढविण्यासाठी वापरली जाणारी गोळी खाल्ल्याने एका ४४ वर्षीय व्यक्तीचा रक्ताच्या उलट्या होऊन जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. आनंद रत्नाकर निकाळजे (वय ४४, रा. म्हाडा कॉलनी, देवळाई - सातारा परिसर) असे मृत व्यक्तीचे नाव असून, या घटनेमुळे सिडको परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. आनंद यांच्या पश्चात एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आनंद निकाळजे हे आपल्या दोन मित्रांसह सिडकोतील ३६ टाऊन सेंटर परिसरात आले होते. त्यांच्याकडे दारूची बाटली आणि एका गोळ्यांची स्ट्रीप होती. रस्त्याच्या कडेला आल्यानंतर आनंद यांनी दारूसोबत ताकद वाढविण्याची एक गोळी घेतली. मात्र, ही गोळी खाल्ल्यानंतर काही वेळातच त्यांना तीव्र त्रास सुरू झाला. त्यांना रक्ताची मोठी उलटी झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, आनंद यांची प्रकृती बिघडून त्यांचा मृत्यू होताच, त्यांच्यासोबत आलेले दोन्ही मित्र त्यांना तिथेच सोडून घटनास्थळावरून पसार झाले.


या घटनेची माहिती मिळताच सिडको पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल येरमे, सहाय्यक पोलीस आयुक्त मनोज पगारे आणि उपनिरीक्षक हरिदास मैदाड यांनी आपल्या पथकासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. दारू आणि ताकद वाढविणाऱ्या गोळ्यांच्या एकत्रित सेवनामुळे रिॲक्शन होऊन हा मृत्यू झाला, की यामागे आणखी काही कारण आहे, याचा सखोल तपास सिडको पोलीस करत आहेत. आनंद यांच्यासोबत असलेले आणि घटनास्थळावरून पळून गेलेले ते दोन मित्र कोण होते, याचाही शोध पोलिसांकडून घेतला जात असून शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## आ राजेश विटेकर यांच्या प्रयत्नांना यश; पुरवणी मागणी बजेट मध्ये 420 कोटी मंजूर

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी.

**परभणी :** पाथरी विधानसभा मतदारसंघांतर्गत असलेले ताडबोरगाव ते साळापुरी या 42 किलोमीटर अंतराच्या कामाला करण्यासाठी तब्बल 420 कोटी निधी करून यादीत मंजूर करण्यात आला आहे. मतदारसंघात आ राजेश विटेकर यांनी सतत पाठपुरावा केला असून रस्त्याचा मार्ग निकाल लागला आहे. मानवत तालुक्यातील सुरु होणाऱ्या म. प्र. मा 222 ताडबोरगाव ते देऊळगाव अवचार ते पाळोदी ते पिंपळा S H61. मंगरूळ ते रामपुरी. साळापुर येथे रुमना MHN752k. रा. मा. 61. असा परभणी तालुक्या पर्यंत एशियन इन्फ्रा इन्वेस्टमेंट बँक यांच्या अंतर्गत होणार आहे. आ विटेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस कडे सतत पाठपुरावा करून अहवाल सा सादर केला होता.

## दुसरे स्त्रीवादी साहित्य संमेलन 28 जूनला; संमेलनाध्यक्षपदी डॉ. उर्मिला चाकूरकर, परिसंवाद व कविसंमेलन रंगणार



**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** स्नेहलता मारुती पाटील सन्मानार्थ पुरोगामी सामाजिक सांस्कृतिक फाउंडेशनच्या वतीने रविवारी ( 28 जून) दुसऱ्या स्त्रीवादी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे साहित्य संमेलन महसूल प्रबोधनीत होणार आहे. या स्नेहलता मारूती पाटील साहित्यनगरी व संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मीनाक्षी पाटील यांच्या हस्ते सकाळी 10 वाजता होणार आहे, अशी माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक प्रा. समाधान दहिवाळ यांनी दिली. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. उर्मिला चाकूरकर या राहतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ताराबाई शिंदे यांचे वंशज संजीवकुमार शिंदे, विनित वाघ, अर्थतज्ञ व लेखक डी. एस. काटे, कैलाश पब्लिकेशनचे प्रकाशक कुंडलिकराव अतकरे, प्रा. समाधान दहिवाळ आदी उपस्थित राहतील. उद्घघाटन समारंभानंतर ताराबाई शिंदे स्त्रीवादी लेखन पुरस्कार शिल्पा कांबळे (मुंबई), सावित्रीमाई फुले समाज प्रबोधन पुरस्कार प्रा.डॉ. विजया गेडाम (चंद्रपूर), स्नेहलता पाटील जीवन गौरव पुरस्कार प्रा. नागोराव कुंभार (लातूर), राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार प्रा. डॉ. नारायण भोसले (मुंबई) यांना मान्यवरांच्या उपस्थित सन्मानित करण्यात येणार आहे.

दुपारच्या सत्रात " स्त्रीवादी साहित्य वास्तव आणि मिथक' या विषयावर मुंबईच्या साहित्यिका प्रा.डॉ. प्रतिभा सराफ यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होईल.

## 40 वर्षांचा न्यायालयीन लढा जिंकूनही मालमत्ता मिळेना; गुलमंडीतील व्यापाऱ्याची न्यायासाठी धाव

### न्यायालयीन आदेश, मालकीची कागदपत्रे असूनही कारवाई नसल्याचा आरोप; जीवे मारण्याच्या धमक्यांची तक्रार



**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील प्रमुख व्यावसायिक केंद्र असलेल्या गुलमंडी परिसरातील आपल्या मालकीच्या मालमत्तेवर बेकायदेशीर ताबा घेण्यात आल्याचा आरोप करत व्यापारी दीपक ईश्वरदास बादशाह यांनी प्रशासनाकडे न्यायाची मागणी केली आहे. न्यायालयीन आदेश, मालकी हक्काची कागदपत्रे आणि पोलिसांकडे तक्रारी करूनही संबंधितांवर कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याचा दावा त्यांनी मंगळवारी आयोजित पत्रकार परिषदेत केला.

खाराकुंवा परिसरातील रहिवासी असलेले दीपक बादशाह यांनी सांगितले की, गुलमंडी येथील संबंधित मालमत्तेबाबत गेली सुमारे चार दशके न्यायालयीन लढा सुरू होता. या प्रकरणात न्यायालयाचे आदेश त्यांच्या बाजूने लागले असून मालकी हक्क सिद्ध करणारी सर्व अधिकृत कागदपत्रेही त्यांच्या ताब्यात आहेत. तसेच नगर भूमापन क्रमांक ४४४३ अंतर्गत संबंधित मालमत्तेची पीआर कार्ड नोंद त्यांच्या नावावर असल्याचा दावा त्यांनी केला.

असे असतानाही काही अज्ञात व्यक्तींच्या मदतीने मनोज बादशाह व अजय चावरिया यांनी मालमत्तेवर बेकायदेशीर ताबा घेतल्याचा आरोप त्यांनी केला. यासंदर्भात सिटी चौक पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल करण्यात आला असून पोलीस आयुक्त कार्यालयातही निवेदन देण्यात आले आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

संबंधित जागेवर आपले दुकान असून न्यायालयीन आदेशानंतरही मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा मिळत नसल्याचा दावा बादशाह यांनी केला. तसेच या प्रकरणात काही अज्ञात व्यक्तींकडून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचाही गंभीर आरोप त्यांनी केला. याबाबत पोलिसांना माहिती देऊनही पुरेशी दखल घेतली जात नसल्याचे त्यांनी सांगितले.

"माझ्या मालकी हक्काची मालमत्ता मला त्वरित मिळावी, बळजबरीने ताबा घेणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी आणि प्रशासनाने न्याय द्यावा," अशी मागणी दीपक ईश्वरदास बादशाह यांनी पत्रकार परिषदेत केली.

# आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव न देणे ही हुतात्म्यांशीही सरकारने केलेली प्रतारणा

### 1984 च्या आंदोलनातील रणरागिणी भारतीताई पोवार यांचे रोखठोक मत

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**उरण /रायगड :** पनवेल तालुक्यातील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला अद्यापही दिबांचे नाव न देणे ही हुतात्म्यांशी सरकारने केलेली प्रतारणा आहे, असे रोखठोक मत १९८४ च्या उरणच्या शेतकऱ्यांच्या लढ्यातील अग्रभागी असलेल्या रणरागिणी भारतीताई पोवार यांनी जसखार येथे मंगळवारी (ता. २३) आपले मत व्यक्त केले. यावेळी भारतीताई म्हणाल्या, "१९८४ च्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व दि. बा. पाटील साहेब करीत होते. ते आंदोलन शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य मोबदला मिळाला म्हणून होते. दि. बा. पाटील साहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांना सरकारने तुरुंगात डांबले होते. त्यावेळी दिबांचा मला आदेश आला, तुम्ही तातडीने निघून या. त्यावेळी मी २३ वर्षांची होती. त्यांचा आदेश शिरसावंद्य मानून मी तान्ह्या बाळाला घरी सोडून कोल्हापूर येथून तडक निघून आले जासईला. त्यावेळी आंदोलनात सहभागी होण्यासाठी उरणला येण्यासाठी माझ्याकडे तिकिटासाठी जवळ पैसे नव्हते. एकाकडून शंभर रुपये उसणे घेऊन आले. पाहतो तर परिसरातील गावे ओस पडली होती. प्रचंड पोलिसांचा फौजफाटा होता. एसआरपी बंदुका जणू रोखूनच होते, अशी भयावह परिस्थिती निर्माण झालेली होती. त्यामुळे दिबांनी जणू काही माझ्यावर विश्वास ठेवून आंदोलनाचे नेतृत्व माझ्याकडे सोपवून पुढील परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी जणू आदेश दिला होता. तो कार्यकर्ती म्हणून मी स्वीकारला आणि आंदोलनाच्या तयारीसाठी गावोगावी जाऊन गुप्त बैठका घेतल्या. या बैठकांमधून निर्धार करण्यात आला. सरकारसमोर झुकायचे नाही. एक इंच जमिनीवर सुद्धा ताबा द्यायचा नाही. त्यामुळे

१९८४ च्या त्या गौरवशाली आणि शौर्यशाली लढ्यात गावोगावच्या शेतकऱ्यांनी घरादाराला कुलपे लावून एकप्रकारे घरावर तुळशीपत्र ठेवून रस्त्यावर उतरले होते. ते दिवस अंगावर काटा आणणारे आहेत." असेही भारतीताई म्हणाल्या.

दिबांची (ता. २५) पुण्यतिथी आहे. त्यामुळे भारतीताई दिबांना अभिवादन करण्यासाठी कोल्हापूरवरून आल्या आहेत. त्यांचे आगमन होताच स्वतः आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे सारथ्य केले. सर्वप्रथम भारतीताई यांनी गव्हाण येथील शांतादेवीचे दर्शन घेतले. त्यानंतर उरण तालुक्यातील जसखार येथील रत्नेश्वरीचे दर्शन घेतले. तेथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश आणि दप्तरांचे वाटप त्यांच्या हस्ते झाले.

यावेळी महेंद्रशेठ घरत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी भारतीताई म्हणाल्या, "आंदोलनाला जवळ जवळ ४२ झालीत, पण माझा सन्मान फक्त महेंद्रशेठ घरत यांनी आईच्या नावाने पुरस्कार देऊन केला. सध्या सर्वांचे भले व्हावे म्हणून विचार करणारा महेंद्रशेठ मला दिसतोय. त्याचे काम मी डोळ्यांदेखत पाहातोय. तो ग्रेट माणूस आहे."

त्यानंतर त्या आंदोलनात सक्रिय असणारे पी. जे. पाटील यांची भारतीताई आणि महेंद्रशेठ घरत यांनी सदिच्छा भेट घेतली आणि आंदोलनातील आठवणींना उजाळा दिला. पी. जे. पाटील परिवाराने यावेळी भारतीताई यांचा साडीचोळी देऊन यथोचित सन्मान केला.

दरम्यान, उरण परिसर पाहून भारतीताई गहिवरल्या. जुन्या आठवणींत रमल्या. महेंद्रशेठ घरत स्वतः गाडी चालवत असल्याने त्यांनी आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांचा, गावांचा, परिसराचा, डोंगररांगांचा आवर्जून उल्लेख केला. हा संपूर्ण परिसर मी पायी फिरले. अनेक जण सोबत होते. तहानभूक विसरून आंदोलन केले. लाखो शेतकरी रस्त्यावर उतरले होते. हे सर्व महेंद्रशेठ घरत ऐकून घेऊन म्हणाले, "मी त्यावेळी १२ वीला होतो. विद्यार्थिदशेत असतानाही आंदोलन सहभागी झालो होतो. माझ्या शेजारी असणाऱ्या गव्हाण कोपर येथील एका सहकारीला गोळी लागली. सगळे सैरावैरा पळत होते, पोलिसांच्या गोळीबारामुळे."

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# प्रामाणिक रिक्षाचालकाने परत केली अडीच लाखांची रोकड व महत्त्वाची कागदपत्रे



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जय भवानी नगर चौक येथून गजानन महाराज मंदिराकडे जात असताना पंचशील नगर परिसरातील अंजली गणेश थोरात (वय ४०) यांची रोख रक्कम व महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग रिक्षामध्ये विसरली. मात्र एका प्रामाणिक रिक्षाचालकामुळे अडीच लाख रुपयांची रोकड आणि सर्व कागदपत्रे त्यांना सुखरूप परत मिळाली.

अंजली थोरात या बालाजी मंगल कार्यालयाच्या पाठीमागील पंचशील नगर परिसरातील रहिवासी असून त्या रिक्षा क्रमांक एमएच-२० डीसी-२०८५ मधून प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान त्या आपली निळ्या रंगाची बॅग रिक्षामध्ये विसरून उतरल्या. या बॅगेत सुमारे २ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम तसेच विविध महत्त्वाची कागदपत्रे होती.

बॅग हरवल्याचे लक्षात येताच त्यांनी संबंधित पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि रिक्षाचा क्रमांक पोलिसांना दिला. त्यानंतर सहाय्यक फौजदार तारव व पोलीस हवालदार वानखेडे यांनी तत्काळ रिक्षा मालकाची माहिती मिळवून चालकाशी संपर्क साधला.

रिक्षाचालक अनिल बाबुराव मंडलिक (वय ४७, रा. पुंडलिक नगर गल्ली क्रमांक २, छत्रपती संभाजीनगर) यांना पोलीस ठाण्यात बोलाविण्यात आले. चौकशीदरम्यान मंडलिक यांनी संबंधित बॅग रिक्षाच्या मागील बाजूस ठेवलेली असल्याचे सांगितले. त्यांनी बॅग उघडून पाहिली नव्हती तसेच त्यामध्ये रोख रक्कम किंवा महत्त्वाची कागदपत्रे असल्याची त्यांना कोणतीही माहिती नव्हती.

अनिल मंडलिक यांनी सदर बॅग स्वतः पोलीस ठाण्यात आणून दिली. पोलिसांनी बॅगेतील रोकड, कागदपत्रे व इतर साहित्याची पडताळणी करून सर्व साहित्य सुरक्षित असल्याची खात्री केली. त्यानंतर बॅग अंजली थोरात यांच्या ताब्यात देण्यात आली. या घटनेमुळे रिक्षाचालक अनिल मंडलिक यांच्या प्रामाणिकपणाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# नियम मोडणाऱ्या 51 दुकानांवर उत्पादन शुल्क विभागाने 20.82 लाखांचा केला दंड वसूल

हिंदू प्रकाशवार्ता । नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य उत्पादन शुल्क विभागाने मागील वर्ष २०२५-२६ मध्ये अत्यंत धडाकेबाज कामगिरी करत शासनाच्या तिजोरीत विक्रमी महसुलाची भर घातली आहे. एकीकडे कर वसुलीचा नवा ऐतिहासिक टप्पा गाठत असतानाच, दुसरीकडे प्रशासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मद्यविक्रेत्यांवर विभागाने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील देशी दारू, विदेशी मद्य आणि वाईन शॉप्ससह एकूण ५१ दुकानांवर दंडात्मक कारवाई करत लाखो रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने जिल्ह्यातील विविध मद्यविक्री केंद्रांची कसून तपासणी करण्यासाठी एक विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत वेळेचे उल्लंघन करणे, साठ्यामध्ये तफावत असणे, बनावट मद्याची विक्री किंवा परवान्यातील अटी व शर्तींचे पालन न करणे अशा विविध कारणांमुळे ५१ मद्यविक्री दुकाने दोषी आढळली. या सर्व नियमबाह्य कृत्य करणाऱ्या दुकानांवर थेट दंडात्मक कारवाईची कुऱ्हाड चालवण्यात आली आहे. या धडक आणि आक्रमक कारवाईतून उत्पादन शुल्क विभागाने एकूण २० लाख ८२ हजार रुपयांचा मोठा दंड वसूल केला आहे. ही दंडाची रक्कम थेट शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात आली आहे. उत्पादन शुल्क विभागाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात नियमबाह्य व अवैध पद्धतीने व्यवसाय करणाऱ्या मद्यविक्रेत्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत. महसुलाचे उद्दिष्ट पूर्ण करत असतानाच, मद्यविक्री क्षेत्रात शिस्त आणि पारदर्शकता आणण्यासाठी ही कडक पावले उचलण्यात आली आहेत. यापुढेही जर कोणत्याही मद्यविक्रेत्याने नियमांची पायमल्ली केली, तर त्यांचे परवाने कायमचे रद्द करण्यात येतील, असा कडक इशारा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिला आहे. या ऐतिहासिक कारवाईमुळे प्रामाणिक व्यावसायिक आणि नागरिकांमधून प्रशासनाचे कौतुक होत आहे.

# "मी पंढरपूरचा डॉन..." म्हणत गोळीबार करणाऱ्या जुबेर पठाणला बेड्या; घटनास्थळी आणून पंचनामा, हर्सूल कारागृहात रवानगी

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पंढरपूर परिसरात "मला पंढरपूरचा डॉन म्हणतात" अशी डरकाळी फोडत हवेत गोळीबार करणाऱ्या आणि नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या जुबेर पठाण याच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे. मंगळवारी (दि. २३ जून) पोलिसांनी आरोपीला घटनास्थळी आणून संपूर्ण गुन्ह्याचा पंचनामा केला. न्यायालयाने आरोपीची रवानगी हर्सूल मध्यवर्ती कारागृहात केली आहे. घटनेची माहिती मिळताच वाळूज एमआयडीसी पोलिसांनी तातडीने धाव घेत तपास सुरू केला. फिर्यादी जावेद शेख यांनी गोळीबाराच्या काडतूसाचे कवच पोलिसांच्या स्वाधीन केले होते. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आणि आरोपी जुबेर पठाण याला बेड्या ठोकल्या.न्यायालयाने आरोपीला २३ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. या कोठडीदरम्यान पोलिसांनी आरोपीकडून



गोळीबारात वापरलेली पिस्टल आणि गुन्ह्यातील दुचाकी जप्त केली आहे. पोलीस कोठडीची मुदत संपल्याने जुबेर पठाण याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपीची न्यायालयीन कोठडीत (MCR) रवानगी केली. त्यानुसार त्याची हर्सूल मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वाळूज एमआयडीसी पोलीस अत्यंत गांभीर्याने करत आहेत.

२० जून रोजी पंढरपूर येथील रांजणगाव रोड परिसरात जावेद शेख आणि आरोपी जुबेर पठाण यांच्यात किरकोळ कारणावरून जोरदार वाद झाला होता. या वादाचे पर्यावसान आदळआपटीत झाले आणि जुबेर पठाण याने स्वतःजवळील पिस्टलमधून थेट हवेत गोळीबार केला. एवढेच नव्हे तर, "मी पंढरपूरचा डॉन आहे" असे म्हणत त्याने जावेद शेख यांना जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे परिसरात प्रचंड घबराट पसरली होती.

## घटनास्थळी क्राईम सीन री-क्रिएशन; नागरिकांची गर्दी

**तपासाचा भाग म्हणून मंगळवारी पोलिसांनी आरोपी जुबेर पठाण याला कडक बंदोबस्तात थेट पंढरपूर येथील रांजणगाव रोडवर आणले. गोळीबार नेमका कसा केला, याचा संपूर्ण घटनाक्रम पोलिसांनी री-क्रिएट (पुनर्रचना) करून सविस्तर पंचनामा केला. यावेळी 'डॉन'ची पोलिसांसमोर झालेली अवस्था पाहण्यासाठी स्थानिक नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.**

# हर्सूल तलावात बुडून बायजीपुऱ्यातील 25 वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** हर्सूल तलावात पोहताना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने एका २५ वर्षीय तरुणाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना रविवारी (२२ जून) सायंकाळी घडली. शेख अफजल अजिज (वय २५, रा. इंदिरानगर, बायजीपुरा) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे बायजीपुरा परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी बायजीपुरा भागातील ५ ते ६ मित्रांचा गट हर्सूल तलावावर फिरण्यासाठी आणि मासेमारी करण्यासाठी गेला होता. सायंकाळच्या सुमारास तलावाच्या परिसरात फेरफटका मारल्यानंतर सर्व मित्र तलावात उतरले. यादरम्यान शेख अफजल याला पाण्याच्या खोलीचा अचूक अंदाज आला नाही आणि तो खोल पाण्यात बुडू लागला. अफजल पाण्यात बुडत असल्याचे लक्षात येताच त्याच्यासोबत असलेल्या मित्रांनी आरडाओरड करून मदतीसाठी नागरिकांना बोलावण्याचा प्रयत्न केला. मात्र, काही मिनिटांतच तो पाण्याचा तळाशी गेला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी तलावात शोधमोहीम राबवून रात्री उशिरा अफजलचा मृतदेह पाण्याबाहेर काढला. याप्रकरणी हर्सूल पोलीस ठाण्यात सध्या आकस्मिक मृत्यूची (AD) नोंद करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

# आ.रत्नाकर गुट्टे यांच्या अथक. प्रयत्नाला यश, रस्त्यासाठी तब्बल 240 कोटीचा निधी मंजूर

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी


**परभणी :** विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील महत्त्वाच्या मार्गापैकी बनवस तांदूळवाडी ते राणीसावरगाव पिंपळदरी तांडा हा जवळपास 24 किलोमीटरचा रस्ता या कामासाठी तब्बल दोनशे चाळीस कोटीचा निधी सह अंतिम अंतिम मंजुरी मिळाली आहे सातत्याने पाठपुरावा करून तसेच शासनाला स्मरणपत्रे देऊन वारंवार अथक प्रयत्न केले गंगाखेड आणि पालम तालुक्याला अनेक गावाला थेट जोडणार आहे त्यामुळे ग्रामीण भागातील दळणवळणासाठी मोठी चालना मिळणार आहे या मंजुरीमुळे शेतकरी विद्यार्थी आणि व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे गंगाखेड परिसर हा प्रामुख्याने शेतीप्रधान असल्यामुळे सोयाबीन कापूस आणि ज्वारी हे मुख्य पिके येथे पिकवली जातात बाजार पेठेत हा माल घेऊन जाण्यासाठी रस्त्याची दुरावस्था झाल्याने वाहतूक मालवाहतूक करणे अवघड जात होते व वाहतुकीचा खर्च वाढत होता बाजारपेठेत पोहोचण्यास विलंब होत होता त्यामुळे मालाची नासाडी होत होती ह्या रस्त्याची अत्यंत गरज असताना नवीन 5.5 मीटर सिमेंट कॉंक्रीट करण्याचे रुंदीकरण आणि रुंदीकरणानंतर शेतकऱ्याची वाहतूक खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे तसेच परभणी गंगाखेड जोडणारा हा पर्याय मार्ग अजूनही महत्त्वाचा ठरणार आहे आ. डॉ. गुट्टे यांनी म्हटले आहे.

तसेच पिंपळदरी तांडा निळा नाईक तांडा यासारख्या दुर्गम भागातील नागरिकांना गंगाखेड येथील उप जिल्हा रुग्णालयापर्यंत पोहोचण्यासाठी याच रस्त्याचा वापर करावा लागणार आहे

# बँक निवडणुकीसाठी माजी आ गजानन घुगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**हिंगोली :** परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे यांनी मंगळवारी दिनांक 23 जून रोजी परभणी येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना गजाननराव घुगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, जिल्ह्यातील सहकार चळवळीची समृद्ध परंपरा जपत शेतकरी, बँकेचे सभासद आणि सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी




आपण कटिबद्ध आहोत. बँकेच्या माध्यमातून तळागाळातील घटकांचा आर्थिक विकास साधणे, शेतकऱ्यांना सक्षम करणे तसेच पारदर्शक आणि लोकाभिमुख कारभाराद्वारे सहकार क्षेत्र अधिक बळकट करणे, हाच आपला मुख्य संकल्प आहे.

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील महत्त्वाची संस्था असून, तिच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासाला गती देण्यासाठी सकारात्मक आणि विधायक भूमिका बजावण्याचा आपला मानस असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळी जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, चेअरमन, सहकार क्षेत्रातील मान्यवर पदाधिकारी, भाजपाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर–जळगाव महामार्गावर अपघातांच्या तिहेरी घटना

**फर्दापूर, दि. 23 :** छत्रपती संभाजीनगर–जळगाव महामार्गावरील अजिंठा घाटात मंगळवारी सकाळी वेगवेगळ्या ठिकाणी तीन अपघातांच्या घटना घडल्या. या घटनांमुळे काही काळ वाहतुकीत अडथळा निर्माण झाला होता. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. पहिली घटना सकाळी सुमारे 10 वाजण्याच्या सुमारास घडली. एमपी 09 एचएच 1606 क्रमांकाचा ट्रक खंडवा येथून छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना अजिंठा घाटातील एका वळणावर यांत्रिक बिघाडामुळे बंद पडला. घाटातील अरुंद वळणावर ट्रक उभा राहिल्याने काही काळ वाहतुकीस अडथळा निर्माण झाला.



दुसरा अपघात घोडपटांगण वळणावर झाला. एमएच 40 एसी 7058 क्रमांकाची कार आणि केए 56 ए 0062 क्रमांकाच्या कंटेनरची समोरासमोर धडक झाली. या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून वाहनातील प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. अपघातामुळे या ठिकाणी काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

तिसरी घटना अधिक गंभीर ठरण्याची शक्यता होती. गोव्याहून पंजाबकडे एसीचा माल घेऊन जाणारा यूके 08 सीबी 0362 क्रमांकाचा कंटेनर घाट उतरत असताना त्याचे ब्रेक निकामी झाले. प्रसंगावधान राखत चालकाने वाहन डोंगराच्या कडेला आदळून थांबविले. या अपघातात कंटेनरच्या केबिनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून चालक व क्लिनर किरकोळ जखमी झाले. वेळेवर घेतलेल्या निर्णयामुळे मोठी दुर्घटना टळली.

अपघातांची माहिती मिळताच फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे यांच्या निगराणी मध्ये पोलीस कर्मचारीआकाश गवळे, फिरोज तडवी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत अपघातग्रस्त वाहने घाटातून खाली आणण्यास मदत केली.

अजिंठा घाटातील तीव्र वळणे, वाढती वाहनांची संख्या आणि अवजड वाहनांची वाहतूक यामुळे या परिसरात वारंवार अपघात घडत असल्याने वाहनचालकांनी सावधगिरी बाळगण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# सोयगाव येथे जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या हस्ते महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२३ जून :** सोयगाव येथे साने हॉस्पिटल शेंदुर्णी व भारतीय जनता पार्टीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सुमारे १५० महिलांनी सहभाग घेऊन आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

यावेळी डॉ.कल्पक साने,डॉ. मयुरी सानप,तेजस्विनीताई काळे,सरपंच नंदाताई आगे,डॉ. स्वाती काळे,सोयगाव भाजपा तालुका अध्यक्ष संजय पाटील,माजी नगराध्यक्ष कैलास





काळे,जिल्हा चिटणीस सुनील गावंडे,शहराध्यक्ष मंगेश सोहनी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर मयूर मनगटे, संजीवन सोनवणे,गजानन पवार,विजय गव्हाड,महेश मानकर,सुनील ठोंबरे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांनी महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.ग्रामीण भागातील महिलांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनासह दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी,या उद्देशाने अशा शिबिरांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. शिबिरात महिलांची विविध आरोग्य तपासणी करण्यात आली.तसेच स्त्रीरोग,पोषण,रक्तक्षय,मातृ आरोग्य व इतर आरोग्यविषयक समस्यांबाबत तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.सुमारे १५० महिलांनी शिबिराचा लाभ घेतल्याने हा उपक्रम यशस्वी ठरला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी साने हॉस्पिटल व सर्व सहकार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी भविष्यातही असे उपक्रम राबविण्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# सेनगावच्या वेदांत पुरीची अमरावतीत शैक्षणिक झेप: अभियांत्रिकी द्वितीय वर्षात द्वितीय क्रमांक

**हिंगोली :** गुणवत्तेच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठ्या शैक्षणिक स्पर्धेत आपला ठसा उमटवू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध करत सेनगाव येथील विद्यार्थी वेदांत जगन्नाथ पुरी याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज अँड मॅनेजमेंट येथे शिक्षण घेत असलेल्या वेदांतने अभियांत्रिकी द्वितीय वर्षाच्या परीक्षेत ७०० पैकी ६१५ गुण प्राप्त करत महाविद्यालयात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. त्याच्या या उज्ज्वल यशामुळे सेनगाव शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वेदांत हा सेनगाव येथील पत्रकार जगन्नाथ पुरी यांचा सुपुत्र असून, सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तबद्ध नियोजन आणि कुटुंबीयांच्या प्रोत्साहनाच्या जोरावर त्याने हे यश मिळविले आहे.

वेदांतच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शैक्षणिक, सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार तसेच नागरिकांकडून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. आगामी काळातही अशाच प्रकारे प्रगतीची नवी शिखरे गाठावीत, अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत. ग्रामीण भागातून उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या वेदांत पुरीच्या कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

# ऑलिम्पिक ज्योत रॅलीने दुमदुमले संभाजीनगर : आंतरराष्ट्रीय पदकविजेत्या खेळाडूंचा गौरव, क्रीडा संस्कृतीचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, विभागीय क्रीडा संकुल समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि विविध क्रीडा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ऑलिम्पिक ज्योत रॅली, क्रीडा प्रात्यक्षिके आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या गौरवाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाची सुरुवात सूतगिरणी चौक येथून काढण्यात आलेल्या भव्य ऑलिम्पिक ज्योत रॅलीने झाली. विभागीय क्रीडा संकुलापर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीत विविध क्रीडा संघटनांचे खेळाडू, प्रशिक्षक, पालक तसेच गीता विद्यालय आणि जय भवानी विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खेळाडूंनी हातात ऑलिम्पिक ज्योत घेऊन क्रीडा संस्कृतीचा संदेश दिल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

मुख्य कार्यक्रमाला डॉ. प्रविण वक्ते (प्र-कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य सतीश इंगळे, राज्य जिम्नॅस्टिक असोसिएशनचे सचिव डॉ. मकरंद जोशी, महाराष्ट्र अॅथलेटिक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष पंकज भारसाखळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. दिनेश वंजारे आणि खो-खो संघटनेचे कोषाध्यक्ष प्रा. गोविंद शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी ऑलिम्पिक चळवळीचे महत्त्व, क्रीडा





संस्कृती आणि निरोगी जीवनशैली यावर मार्गदर्शन केले. यंदाच्या ऑलिम्पिक दिनाच्या "Move, Learn and Discover" या घोषवाक्याला प्रतिसाद देत उपस्थितांनी नियमित व्यायाम, खेळ आणि निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला.

कार्यक्रमात योग, तायक्वांदो आणि मल्लखांब या खेळांची आकर्षक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत उपस्थितांची दाद मिळवली. या सादरीकरणांमधून शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, संतुलन आणि आत्मविश्वासाचा संदेश देण्यात आला.

यावेळी दक्षिण कोरियातील बुसान येथे झालेल्या १० व्या कोरिया ओपन एरोबिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धा-२०२५ मध्ये कांस्यपदक पटकावणाऱ्या खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला. ग्रुप इव्हेंटमधील आर्य शहा, स्मित शहा, रामदेव बिराजदार, अद्वैत वझे आणि उदय माधेकर तसेच एरो स्टेप स्पर्धेतील रोहन पागरे, अभय उन्तवाल, संकेत चिंतलवाड, तनिष्क राजगावंकर, प्रेम बांकर, श्रीपाद हराळ, दीपक अर्जुन आणि संदेश चिंतलवाड यांचा गौरव करण्यात आला.

तसेच आंतरराष्ट्रीय पॅरा जलतरणपटू रितेश केरे, आट्यापाट्या खेळातील रोहन काळे, सागर सोनवणे व वंशिना कांबळे, तलवारबाजीतील शिवछत्रपती पुरस्कार विजेते सागर मगरे तसेच आरुष जमधाडे, समर्थ पठाडे, वैदेही लोहिया आणि कबड्डीपटू अल्केश चव्हाण यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जगताप यांनी केले. विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, प्रशिक्षक, खेळाडू, पालक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी वक्त्यांनी खेळ हा केवळ स्पर्धेचा विषय नसून व्यक्तिमत्त्व विकास, शिस्त, संघभावना आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून "खेळातून मैत्री, खेळातून शांतता आणि खेळातून मानवतेची एकता" हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911